सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo.86868 88898

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ | अंक - २१२ | शनिवार, दि.०९ ऑगस्ट २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 | Issue - 212 | SATURDAY, DT.09 AUGUST 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4



## सामाजिक कार्यकर्ता फैमिदा काझी यांनी घेतली पोलिस अधिक्षक नितिन बगाटे सरांची भेट

रत्नागिरी:दिनांक ०८/०८/२५ रोजी , लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र रत्नागिरी चे अध्यक्ष फैमिदा काझी,तसेच संवाद सोशल फाउंडेशन च्या संस्थापिका व राज्य अध्यक्ष व मानव अधिकार सामाजिक सुरक्षा संघ महाराष्ट्र राज्यध्येक्ष पदी कार्यरत असलेल्या क्षीमती फैमिदा काझी, आणि फरहा मुजावर यांनी रत्नागिरी जिल्हा पोलिस अधिक्षक मा.नितिन बगाटे सर यांची भेट घेऊन त्यांना पुष्पगुच्छ देउन सदिच्छा भेट दिली

# नूतन मुख्याधिकारी यांच्यासमोर अभियंता किरण देशमुखची पोलखोल होणार !

## बीड नगरपालिकेत बोगस बिलांचा झालेला घोटाळा पुराव्यासह नव्याने चव्हाट्यावर येणार

विश्वनायक न्यूज

बीड नगरपालिकेमध्ये अत्यंत मोठ्या स्वरूपात घोटाळे झालेले आहे. बोगस गुंठेवारीसह बांधकाम विभागात बोगस बिलांचा कहर झाला आहे. एकाच रस्त्यावर तीन-तीन बिले उचलण्यात आली आहे. कामे न करता बिल उचलून कोट्यावधी रुपयांचा घोळ घातला गेला आहे.गुत्तेदार तेच, कामेही तीच, कर्मचारीही तेच खाजगी लोकही तीच या सगळ्यांना सोबत घेत अभियंता किराणा देशमुख यांनी मोठा घोटाळा केल्याचे यापूर्वीच उघडकीस आलेले आहे. यापूर्वीच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या आशीर्वादमुळे देशमुख आजवर वाचले गेले, मात्र आता नूतन मुख्याधिकारी यांच्याकडून देशमुख यांच्यावर योग्य ती कार्यवाही होण्याच्या अपेक्षा आहे. नगरपालिकेच्या बांधकाम विभागातील किरण देशमुख यांनी अभियंता म्हणून काम करताना अनेक बोगस कामे केलेली असल्याची चर्चा आहे. याबाबत अनेकांनी यापूर्वी तक्रारी केल्या मात्र त्या प्रत्येक तक्रारीची दखल घेतली गेली नाही. एका रस्त्यावर अनेक बिले उचलण्यात आली, चुकीच्या पद्धतीने टेलर केले गेले. आपल्याच नातेवाईकांच्या कंपनीला कामे दिली. गेल्या दोन वर्षांमध्ये दहा लाखाच्या आतील बिलामध्ये मोठे घोटाळे केले गेले.नगर अभियंता यांच्या ऐवजी स्वतःच सह्या मारल्या आणि बिल उचलण्यात आली. देशमुख यांनी केलेल्या या सगळ्या गैर कामांची चौकशी करण्याची मागणी अनेकांनी केली सेवा ऑडिट करण्याची सुद्धा मागणी करण्यात आली होती, मात्र त्यावर पुढे काहीच कार्यवाही प्रशासनाकडून झाली नाही. कोट्यवधींच्या बोगस बिलांचा हा घोटाळा आता पुन्हा एकदा पुराव्यासकट चव्हाट्यावर आणला जाणार आहे. बदलून गेलेल्या मुख्याधिकारी नीता



अंधारे यांच्या संरक्षण कवचामुळे वाचलेले अभियंता 'किराणा' देशमुख आता नव्या मुख्याधिकाऱ्यांच्या तावडीत सापडले जाणार आहेत. नूतन मुख्याधिकारी हे शिस्तीचे मानले जात असून, ते आलेल्या तक्रारीचे गांभीर्याने खाली घेतील आणि योग्य ती कार्यवाही करतील अशी अपेक्षा आहे.

### आता नगरपालिकेची पायरी चढावी लागेल

किरण देशमुख हे नगरपालिकेत कर्मचारी असताना ते कधीच नगरपालिकेत आले नाही. स्वतःचे खाजगी ऑफिस त्यांनी सुरू केले आणि त्यातून ते नगरपालिकेचा कारभार पाहतात. याबाबत शहरातील जागरूक नागरिकांनी वेळोवेळी मागणी करून चौकशी करण्याची विनंती केली मात्र ती धुडकावण्यात आली. तत्कालीन मुख्याधिकारी यांच्या जीवावर देशमुख यांनी नगरपालिका प्रशासन आणि नागरिकांना अक्षरशः बोटावर खेळविले मात्र आता नूतन मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीत त्यांना नगरपालिकेत बसावेच लागणार आहे.

### संरक्षण देणाऱ्या मुख्याधिकारी यांची बदली झाल्याने आता त्या गुबगुब्याला कोण वाचविणार

प्रत्येक वेळी कोणत्याही कामांमध्ये मुख्याधिकारी या संरक्षण देत वाचवायच्या. मात्र आता त्या गेल्याने त्या गुबगुब्याला कोण वाचविणार, अशी चर्चा शहरभरातून होत आहे. शहरातील नागरिकांसाठीच्या विकासासाठी आलेला पैसा स्वतःचा खिसा भरणाऱ्यांना आता जड जाणार असून, घोटाळा केलेली सगळी प्रकरणे नूतन मुख्याधिकारी यांच्यासमोर पुराव्यासह मांडली जाणार आहेत. नगरपालिका प्रशासनाने माहिती मागवूनही जर ती दिली नाही तर त्या विरोधामध्ये कोर्टात दाद मागितली जाणार आहे.

# ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण करा

## बीड नगर परिषदेतील वसुली विभागाचे स्थलांतर करा

बीड ।प्रतिनिधी

शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण करावे तसेच बीड नगर परिषदेतील वसुली विभागाचे स्थलांतर करावे अशा मागण्या मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवरचे परिपूर्ण नूतनीकरण करणे आवश्यक आहे. गेल्या काही महिन्यात नागरिकांनी पुढे येत स्वतःहून खर्च करत ऐतिहासिक कारंजा टॉवर लगत सिमेंटचे बाकडे लावले, झाडे लावली, विद्युत मोटारी लावल्या,



रंगबिरंगी लाइट्स लावल्या, पाण्याचे फवारे सुरू केले, कंपाउंड ला असलेल्या लोखंडी ग्रील ला रंगरंगोटी केली. तरीसुद्धा या ऐतिहासिक वास्तूचे परिपूर्ण नूतनीकरण करण्याकरिता अजूनही आवश्यक असलेली बारा कामे बाकी आहेत. या कामांची यादी मुख्याधिकारी यांना निवेदनातून देण्यात आली आहे. तसेच बीड नगर परिषदेतील वसुली विभाग तिसऱ्या मजल्यावरून पहिल्या मजल्यावर हलविण्यात यावे. कारण वसुली विभागात विविध कर भरण्यासाठी जाणाऱ्या ज्येष्ठ आणि वयस्कर नागरिकांना खूप त्रास होतो आहे. यामुळे श्वासोच्छवास कमी-अधिक प्रमाणात झाल्यास नागरिकांच्या जीवावर बेतू शकते. म्हणून नवनियुक्त मुख्याधिकारी यांनी या दोन्ही बाबींकडे स्वतः जातीने लक्ष देऊन ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नुतनीकरण करण्यासाठी आवश्यक ते कार्य करावे तसेच बीड नगर परिषदेतील वसुली विभाग तिसऱ्या मजल्यावरून पहिल्या मजल्यावर स्थलांतरित करावे अश्या मागण्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केल्या आहेत.

# आमदार संदीप क्षीरसागर यांनी दिलेला शब्द पाळावा - युवराज जाधव

## नदीवरचा पूल विद्यार्थी पाण्यात वाहून गेल्यावर होणार का ?

नाळवंडी ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नाळवंडी या ठिकाणी पाठीमागील दोन वर्षांपूर्वी बीड मतदार संघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी नाळवंडी गावातील भीम नगर व लहुजी नगर ला जोडला जाणाऱ्या नदीवरील त्या जागेची पाहणी करून त्या ठिकाणी काम प्रारंभीत करण्यासाठी नारळ देखील फोडले होते. परंतु नारळ फोडून तब्बल आता दोन वर्ष झालेली आहेत परंतु अद्याप देखील त्या ठिकाणी पूल झालेला नाही. याच परिसरातून नदी ओलांडत शाळेतील विद्यार्थ्यांना,



वयोवृद्धांना, तरुणांना जीव मुठीत घेत नदीच्या मोठ्या प्रवाहातून प्रवास करत शाळेसाठी किंवा इतर कामकाजासाठी गावात यावे लागत आहे. या प्रश्नावर सदरील परिसरातील नागरिकांनी वेळोवेळी स्थानिक पुढाऱ्यांकडे व जिल्हाधिकारी यांच्याकडे तसेच आमदार संदीप क्षीरसागर यांच्याकडे पाठपुरावा केलेला आहे परंतु सदरील कामकाजाबद्दल अद्याप देखील आमदार बोलत नसल्याकारणाने आता भीम नगर व लहुजी नगर मधील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळलेली आहे. तरी सदरील पुलाचे काम आमदार संदीप क्षीरसागर यांनी लवकरात लवकर सुरू करून सदरील परिसरातील ग्रामस्थांची हेळसांड थांबवावी अशी विनंती दोन्ही परिसरातील ग्रामस्थान मधून होत आहे.

# कामगार नेते गौतम आगळे यांनी घेतली मुख्याधिकाऱ्यांची भेट

## बीड शहरातील घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर केली चर्चा

बीड ।प्रतिनिधी

रोजंदारी मजदूर सेनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे पदाधिकारी कामगार प्रतिनिधी च्या शिष्टमंडळाने शुक्रवारी दिनांक ८ ऑगस्ट रोजी दुपारी ४:३० वा. नवनियुक्त नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची भेट घेतली. शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध समस्यांबाबत सविस्तर चर्चा करून मागिल ०२ वर्षांपासून घनकचरा व्यवस्थापनातील १५० कंत्राटी कामगारांना अयोग्य व बेकायदेशीररित्या कामावरून कमी केल्याने शहरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सदरील कामगारांना तात्काळ कामावर रुजू करून घ्यावे अन्यथा मंगळवार दिनांक १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता नगरपरिषद बीड समोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. यावर तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन नगर परिषद बीड मुख्याधिकारी फडसे यांनी दिले.

निवेदनात म्हटले की शहरात घंटागाडी वेळेवर पाठवून नाल्यातील व रस्त्यावरील कचरा त्वरित उचलणे,



चौका चौकातील जी घाण साचली आहे, त्यामुळे बीड शहरातील नागरिकांनवर आरोग्य च्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या तात्काळ दूर करण्यासाठी स्वच्छता मोहीम राबवावी असे नमूद केले आहे. शिष्टमंडळात रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर, मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड, बीड जिल्हा अध्यक्षा अनिता बचुटे, उपाध्यक्षा सुनीता जोगदंड कामगार प्रतिनिधी बबीता तांगडे, सुनीता जोगदंड राजकुमारी मच्छल, बीना सौदा इत्यादी उपस्थित होते. अशी माहिती संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.



**शिराढोण : कळंब तालुक्यातील शिराढोण येथे सलीम गनी शेख उर्फ सैलानी शेठ यांच्या कडून स्वखर्चातून गावातील ओला व सुखा कचरा जमा करण्यासाठी घंटा गाडी गावासाठी दान देण्यात आली व त्याचे लोकार्पण शिराढोण पोलीस निरीक्षक धरणीधर कोळेकर व मा. जिल्हा परिषद सदस्य शहाजी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी कचरा कुंड्याचेही लोकार्पण करण्यात आले.कचरा कुंड्या गावातील व्यापाऱ्या देण्यात आल्या.घंटा गाडीच्या इंधन व चालकाचा पूर्ण खर्च सलीम शेख करणार आहेत या वेळी भाऊसाहेब पाटील,राजेश्वर पाटील,उपसरपंच अमोल माकोडे,नितीन आबा पाटील,पद्माकर पाटील,नासेर पठाण,बाळासाहेब सोनके ग्राम पंचायत सदस्य ड नितीन यादव,अय्युब खुरेशी,राजू डांगे,सुमंत नाईकवाडे, आकाश धाकतोडें,अमोल नाईकवाडे,सलमान बडे,मतीन भगवान,सलमान बडे, बब्बु खुरेशी,शिवाजी गाडे,श्रीपाद कापसे,राजेंद्र वाघमारे,उत्तम खडबडे,मकबूल डांगे,कलीम भगवान,मनोज पाटील,अलीकबर पठाण, अमीर डांगे,सुरेश माकोडे,दादा खतीब,नूर डांगे,ड अमोल माकोडे,संजय नानजकर आदी लोकार्पण वेळी उपस्थितीत होते.**



# डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे पदाधिकारी

## माजी नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने नवनियुक्त नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची भेट घेतली

बीड ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी (दि.८) नवनियुक्त नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची भेट घेतली. शहरातील रस्ते, अस्वच्छता, वीजपुरवठा, पाणीटंचाई तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध समस्यांबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन सादर करण्यात आले. यावर तत्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन मुख्याधिकारी फडसे यांनी दिले.

निवेदनात म्हटले की, शहरात घंटागाडी वेळेवर पाठवून नाल्यातील व रस्त्यावरील कचरा त्वरित उचलणे, मोठ्या नाल्यांची स्वच्छता करणे, बंद पडलेल्या स्ट्रीटलाईट सुरू करणे, नव्या स्ट्रीटलाईट आणि मिनी हायमास्ट बसवणे, चौकाचौकातील लाईट कार्यान्वित करणे, नवीन पोल बसवून एलईडी लाईट बसवणे, पाणी पुरवठा सुरळीत व वेळेवर करणे, पाईपलाईन लिकेज दुरुस्त करणे तसेच अमृत अटल पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासाठी प्रयत्न करणे. तसेच, स्व. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह (नागोबागल्ली), बौद्धविहार दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली. पंतप्रधान आवास घरकुल योजना आणि रमाई घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते वाटप करणे, शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे, अतिक्रमण हटवणे, प्रमुख रस्त्यांना मंजुरी देणे (स्टेडियमजवळील रस्ता, धानोरा रोड, ब्रह्मकुमारी केंद्र ते उर्वी अपार्टमेंट, तहसील ते निरा हॉस्पिटल मार्ग), प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजवणे आणि दलित वस्ती तसेच इतर नागरी वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरविणे यांसारख्या मागण्या निवेदनात नमूद आहेत. शहरातील दैनंदिन जीवनाशी निगडित या सर्व समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शिष्टमंडळाने केली असून, मुख्याधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरच आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, माजी नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनियुक्त मुख्याधिकाऱ्यांचा सत्कार

बीड नगरपरिषदेचे नवनियुक्त मुख्याधिकारी शैलेश फडसे हे नुकतेच रुजू झाले आहेत, त्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, माजी नगरसेवकांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# बीड शहरातील अनाधिकृत बॅनर हटवण्यासाठी ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी

## पालकमंत्री अजीत पवार यांना निवेदन; १५ ऑगस्टपर्यंत कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा नितीन सोनवणे

बीड : बीड शहरातील अनाधिकृत बॅनर आणि होर्डिंग्जमुळे होणारे विद्रूपीकरण आणि वाहतूक अडथळ्याच्या समस्येवर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी ऑल इंडिया पँथर सेनेने केली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली मा. पालकमंत्री अजीत पवार यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

नितीन सोनवणे यांनी सांगितले की, शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळ्यांसह जालना रोड, नगर रोडसारख्या मुख्य मार्गांवर मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बॅनर



लावले जातात. यामुळे शहराचे सौंदर्य बिघडत असून, वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. यावर उपाय म्हणून, पुणे आणि संभाजीनगरच्या धर्तीवर बीड नगरपरिषदेने मुख्य मार्गांवरील दुभाजकांवर जाहिरात होर्डिंग्ज उभारावेत, अशी मागणी त्यांनी केली. यामुळे नगरपरिषदेला महसूल मिळेल, अनाधिकृत बॅनर थांबतील आणि होर्डिंग्जची विटंबना टळेल.

तसेच, मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहावरील शासकीय जागेतील होर्डिंग तात्काळ हटवण्याची मागणीही सोनवणे यांनी केली. १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत प्रशासनाने यावर कारवाई न केल्यास ऑल इंडिया पँथर सेना असंख्य कार्यकर्ते पदाधिकार्या समवेत तीव्र आंदोलन करेल, असा इशारा त्यांनी दिला.बीड शहर स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाने तात्काळ पावले उचलावीत, असे आवाहन नितीन सोनवणे यांनी केले आहे.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस सोशल मीडिया बीड जिल्हाध्यक्षपदी मेघराज जगदाळे

बीड (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सोशल मीडिया विभागाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी मेघराज जगदाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या शिफारशीवरून सोशल मीडिया विभागाचे प्रदेशाध्यक्ष आनंद पवार यांनी केली.

मुंबईत झालेल्या कार्यक्रमात पक्षाचे सरचिटणीस आ.शिवाजीराव गर्जे, लतीफ तांबोळी, बोरगे यांच्या उपस्थितीत ही निवड जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर बीडमध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते मेघराज जगदाळे यांना गुरुवारी (दि.७) नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे उपस्थित होते. दरम्यान, मेघराज जगदाळे हे गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सोशल मीडिया माध्यमातून पक्षाची वैचारिक भूमिका आणि अजितदादा पवार यांचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी



देण्यात आली आहे. या निवडीबद्दल मेघराज जगदाळे यांचे जिल्हाभरातून अभिनंदन होत आहे.


# मराठवाड्यात पावसाची जोरदार बॅटिंग

## परभणी, नांदेडसह हिंगोलीत मुसळधार पाऊस, अनेक ठिकाणी अतिवृष्टी

छत्रपती संभाजीनगर : गेल्या काही दिवसांपासून राज्यातील अनेक ठिकाणी पावसाने उघडीप दिल्याचे पाहिला मिळत आहे. त्यात आता मोठ्या खंडानंतर पावसाने पुन्हा जोरदार आगमन केले आहे. गुरुवारी, शुक्रवारी दिवसभरात पावसाने सर्वत्र हजेरी लावली. विभागीय आयुक्त कार्यालयातून प्राप्त माहितीनुसार, विभागातील हिंगोली, परभणी आणि नांदेड जिल्ह्यामध्ये पावसाचा अधिक जोर होता. येथील एकूण १६ मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

जवळपास आठवडाभरापासून पावसाची प्रतीक्षा होती. पावसाअभावी पिकेही सुकून जात होती. शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली होती. या काळात कडक ऊन पडत असल्यानेही पिकांना धोका निर्माण झाला होता. परंतु गुरुवारी सकाळी सात ते आठच्या सुमारास सर्वत्र पावसाने पुनरागमन करून दिलासा दिला. दरम्यान, गुरुवारी दिवसभरात अधूनमधून पावसाची हजेरी सुरु होती.

विभागात गुरुवारी सकाळी ते शक्रवारी सकाळी ८ वाजेपर्यंत एकूण १४. ८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यात सर्वाधिक ४८. ८ मिमी हिंगोली, त्यानंतर नांदेडमध्ये ३०. ० मिमी तर परभणी जिल्ह्यात २३. ५ मिमी पाऊस झाला आहे. या तिन्ही जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याचेही समोर आले आहे. दरम्यान, मराठवाड्यात पावसाची बॅटिंग सुरु झाली असली तरी संभाजीनगर, जालना, बीड, लातुरात मात्र पावसाने किरकोळ हजेरी दिल्याचे चित्र आहे.





## कुंबेफळ येथे१९ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन केली आत्महत्या

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

तालुक्यातील कुंबेफळ येथे राहणाऱ्या १९ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. साहिल संतोष शिंदे असे या तरुणाचे नाव असून तो पुण्याला जातो असे सांगून घरातून बाहेर पडला होता. मात्र शुक्रवारी (दि. ८ ऑगस्ट) दुपारी गावालगतच्या तळ्याशेजारी असलेल्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली.घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात पाठवला. साहिलने आत्महत्या का केली, यामागील कारण अद्याप अस्पष्ट असून पोलिसांकडून तपास सुरू आहे. कुंबेफळ परिसरात या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

# धनंजय मुंडेंचं दहशतीचे राजकारण आता संपलंय–अंजली दमानिया

मुंबई : पालकमंत्री अजित पवार यांचा बीड दौरा आणि सभेतील वक्तव्ये यांचा संदर्भ देत धनंजय मुंडेंचं दहशतीचे राजकारण आता संपलंय, अशी टीका सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे.दमानिया म्हणाल्या, बीडमध्ये पालकमंत्री अजित पवार गेले असताना तिथे धनंजय मुंडे कुठेही दिसले नाही हा पहिला मुद्दा. दुसरा मुद्दा भाषणात अजित पवार म्हणतात की, इथे कोणाचे बड्या बापाचा बेटा असला तरी सुद्धा त्याच्यावर कारवाई होईल. तिसरा डायलॉग त्यांचा की, आका असो काका असो सगळ्यांवर कारवाई होईल. एकदा माफ केलं जाईल, दोनदा केलं जाईल तिसऱ्या चौथ्यांदा जर झालं तर चौथ्यांदा थेट त्यांच्यावर मकोका घालावा ह्या ज्या सगळ्या गोष्टी बोलल्या गेल्या.

दमानिया म्हणाल्या, राजाभाऊ मुंडे नावाच्या व्यक्तीला जे अजित पवार गटात घेतलं गेलं याचा अर्थ धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे या कुटुंबाचं राजकारण आता संपलं. आता वंजारी



समाजाला जवळ ठेवण्यासाठी राजाभाऊ मुंडे ना घेतले गेले, पण या सगळ्या बोलण्यावरून आपल्याला दिसतंय की आता धनंजय मुंडे यांना कुठेही धारा मिळणार नाही आणि म्हणून मी आज सकाळी बघितले. सात वाजल्यापासून बातमी चालतीये की, संतोष देशमुख प्रकरणात धनंजय मुंडे यांचा सहभाग नाही. ही बातमी आली कुठून ते स्पष्टपणे अजित पवार धनंजय मुंडेना बाजूला करतात म्हणूनच धनंजय मुंडेनी थेट कार्यकर्त्यांद्वारे ही पेरली आहे.

धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबद्दल बोलताना दमानिया म्हणाल्या की, संतोष देशमुख यांचे जेव्हा फोटो बाहेर आले त्याच्यातली क्रुरता बाहेर आली आणि तो कृतांत करणारा कराड हा धनंजय मुंडे यांच्या जवळचा होता म्हणूनच त्यांचा राजीनामा घेतला गेला. वरून दबाव होता की नव्हता त्याच्याशी मला काही घेणं देणं नाही. जनभावना जी होती ती ही होती आणि त्यासाठी त्यांचा राजीनामा घेतला गेला.

# मराठा–ओबीसी दंगली घडल्यास फडणवीस जबाबदार; मनोज जरांगे

मराठा आरक्षणाच्या लढ्यासाठी पुन्हा एकदा मैदानात उतरलेले नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप करत २९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईत मराठा समाजाच्या विशाल मोर्चाची घोषणा केली आहे.साताऱ्याच्या फलटण तालुक्यात मराठा समाजाच्या बैठकीत बोलताना जरांगे यांनी फडणवीसांवर मराठा ओबीसी समाजात दंगल घडवण्याचा कट रचत असल्याचा साताऱ्याच्य फलटण तालुक्यात मराठा समाजाच्या बैठकीत बोलताना जरांगे यांनी फडणवीसांवर मराठा ओबीसी समाजात दंगल घडवण्याचा कट



रचत असल्याचा थेट आरोप केला.

ते म्हणाले, मराठा आणि ओबीसीत दंगल घडली, तर त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच जबाबदार असतील. याचा फटका केवळ राज्य सरकारलाच नाही, तर केंद्रातील भाजप सरकारलाही बसेल.मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी जरांगे यांनी २९ ऑगस्टला मुंबईत चलो मुंबईचा नारा दिला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा येथील दौऱ्यात मराठा समाजाकडून मिळालेल्या प्रचंड पाठिंब्यामुळे जरांगे उत्साहित आहेत.ते म्हणाले, पश्चिम महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने मराठा बांधव मुंबईला येतील. मराठवाडा आणि विदर्भातूनही तितक्याच ताकदीने समाज येईल. २९ ऑगस्टला आम्ही आरक्षणाचा तुकडा पाडणार, आणि तो ओबीसीतूनच मिळवणार. यासोबतच, त्यांनी अंतरवाली सराटी येथील लाठीचार्जसाठी फडणवीसांना थेट जबाबदार धरले, ज्यामुळे मराठा आंदोलकांवर पोलिसांनी कारवाई केली होती.

# नागरीकांच्या स्वप्नातील घर करणारे इंजि.अमोल झांबरे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

वाढदिवसाच्या निमित्त शुभेच्छांचा वर्षाव

आष्टी /प्रतिनिधी

नागरीकांना परवडणा–या दरात त्यांच्या स्वप्नातील घराचे स्वप्न साकार करुन देणारे तालुक्यातील प्रसिद्ध असलेले इंजि. अमोल झांबरे यांनी वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. दिव्यांग मुकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करुन सामाजिक भावनेने प्रेरित होऊन वाढदिवस साजरा केला त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी हितचिंतकांनी गर्दी केली होती. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सोशल मीडियावर सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला.

आष्टी शहरात २०१७ पासून इंजि. अमोल झांबरे हे या क्षेत्रात असून अत्यंत शांत, संयमी, हुशार व मित्रत्व टिकवण्याचा त्यांचा मनमिळावू स्वभाव असल्याने मोठा मित्र परिवार जोडला आहे. नागरीकांना त्यांच्या स्वप्नातील घरांचे दर्जेदार कॉलिटी चे काम प्लॅन देणे व मटेरियल सहित उत्कृष्ट कॉलीटीतील बांधकाम करून देत असून घर बांधायचं म्हटलं की नागरिकांसमोर एकच नाव समोर येतं ते म्हणजे इंजिनियर अमोल झांबरे त्यांचा ५ ऑगस्ट रोजी वाढदिवस मोठ्या उत्साहात मित्र परिवाराच्या वतीने साजरा करण्यात आला. आष्टी शहरातील छत्रपती शाहू महाराज निवासी मुकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला आपुलकी व सहकार्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

सामाजिक जाणीवेतून साजऱ्या झालेल्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या दीर्घायुष्याच्या आणि यशस्वी वाटचालीच्या



शुभेच्छा दिल्या. शुभेच्छा देण्यासाठी नागरिकांनी दिवसभर त्यांच्या आँफिसमध्ये मोठी गर्दी केली होती. वाढदिवसानिमित्त आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस, सौ. प्राजक्ताताई धस, गणेश नाना शिंदे, सतीश धस, रामशेठ मधुरकर, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार राजेंद्र लाड, सय्यद बबलु, निसार शेख, संतोष नागरगोजे, समीर शेख, सुभाष गोंदार्डे, कैलास वर्धमाने, सीए दर्शन गोंदार्डे, महेश शिंदे, भैरवनाथ उद्योग समूहाचे ईश्वर राऊत, शरद शेठ गायकवाड, रमेश तांदळे, मा.सरपंच विठ्ठल राख, राजेंद्र राख, पोपटराव आजबे, प्रविण झांबरे, विलास गोयकर, सुधाकर पाटील, सरपंच सुधीर पठाडे, सरपंच नवनाथ गर्जे, सरपंच शहाजी साप्ते, गोवर्धन शेंबडे, संपत सायकड, बापू कार्ले, अशोक साप्ते, किरण सातपुते, सचिन धस, सोमा पोठरे, रवींद्र धस, रमेश भोगाडे, प्रकाश सोले, राजू रेडेकर, प्रवीण धोंडे, संतोष मुटकुळे, अनिल मुटकुळे, प्राध्यापक थोरवे सर, तोडकर सर, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, विविध क्षेत्रातील नागरिकांनी शुभेच्छा दिल्या.

# सह दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये महसुल सप्ताहाचे आयोजन



## सह दुय्यम निबंधक कार्यालया समोर वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वतीने केज तालुका कार्यालयात दि.१ ते ७ आगष्ट कालावधी दरम्यान महसूल सप्ताह आयोजीत करण्यात आला.शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी विशेष माहिती सह दुय्यम निबंधक श्रीमती एस. के.परदेशी व कनिष्ठ लिपिक श्री.समिर शेख यांनी पक्षकारांना मार्गदर्शन केले.सलोखा योजना,जमीन अदला बदल पत्र इत्यादी सुविधा प्रदान करण्यात आल्या.या सप्ताह काळात मुद्रांक विक्रेते श्री.उत्तम थोरात,वचिष्ट घोळवे,श्रीराम शेटे, हारुण कुरेशी,खाजा शेख,अजिज शेख, मोहन चाटे,भगवान जमाले,किसन महाजन अनंत सिरसट,गणेश आरकडे तसेच लेखनीक भिमराव लोंढे,रामभाऊ धनवडे, आश्रुबा रांजणकर, तसेच अड व्ही.एम मुंडे, अड.बी.जे.गुंडरे,पप्पु वाघमारे,जोशी,हिराचंद काळे,धैर्यशील देशमुख आदी उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड – ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com